# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सोलापुर शहर **P.S.(ठाणे):** जेल रोड

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0366 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 07/08/2024 19:31

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** सोमवार
   **Time Period (कालावधी):** पहर 5
   **Date From (दिनांक पासून):** 15/07/2024
   **Date To ( दिनांक पर्यंत):** 15/07/2024
   **Time From (वेळेपासून):** 12:42 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 14:29 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 07/08/2024 **Time (वेळ):** 18:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 023

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 07/08/2024 19:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** मा जिल्हाधिकारी सोलापूर यांचे ,निवासस्थानाच्या शेजारी असलेल्य,नेहरूनगर कार्यालय सोलापूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): मोहम्मद असद मोहम्मद इक्बाल कुरेशी

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1994

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | 114,ए, सिध्देश्वर पेठ, हवाई ट्रेड,जवळ सोलापूर,जेल रोड,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | 114,ए, सिध्देश्वर पेठ, हवाई ट्रेड,जवळ सोलापूर,जेल रोड,सोलापुर शहर, महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9834351659

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संदिप भिमराव लटके | पद- मंडळ अधिकारी नेम -सोरेगांव | | 1. 302,पारस अपार्टमेंट, चंदन नगर, जुळ,सोलापूर,जेल रोड, सोलापुर शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | पवनकुमार मोहनराव चव्हाण | पद- तलाठीनेम - सज्जा नेहरुनगर | | 1. श्री अजय जवळकर यांचे 111 शिवरत्न नगर, पतंजली स्टोअरच्य,मागे,जुळे सोलापूर, जेल रोड,सोलापुर शहर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-) (चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दि :- 07/08/2024
मी मोहम्मद असद मोहम्मद इक्बाल कुरेशी, वय 30 वर्षे, व्यवसाय -नालंदा इस्टेट डेव्हलपर्स येथे सुपरवायझर, रा. 114, ए, सिध्देश्वर पेठ, हवाई ट्रेडर्स जवळ सोलापूर मो.क्रं.9834351659, समक्ष उपस्थित राहुन फिर्याद देतो की,
मी दि. 15/07/2024 रोजी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर येथील पोलीस निरीक्षक श्री उमाकांत महाडिक यांचे समक्ष उपस्थित राहून माझ्याकडे होत असलेल्या लाच मागणीबाबत थोडक्यात तक्रार सांगीतली. त्यावर पोनि महाडिक यांनी माझ्या तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता दोन शासकीय पंच उपलब्ध करुन घेतले व सदर ठिकाणी माझी व दोन्ही पंचांची एकमेकांशी ओळख करून दिली. त्यानंतर पोनि महाडिक यांचे सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्यावर मी सांगीतलो की,
मी नालंदा ईस्टेट डेव्हलपर्स येथे सुपरवायझर म्हणून काम करत असुन माझे वडील हे सदर कंपनीमध्ये भागीदार आहेत. सदर कंपनीच्या मालकीची नेहरु नगर येथे गट 28/1/2/2/ मध्ये एकुण 86 आर खुली जागा असुन महसुल प्रशासनात झालेल्या संगणकीकरणानंतर सदर जागेचा 7/12 उतारा बंद दाखवित असल्याने कंपनीने सदरबाबत तलाठी नेहरुनगर अर्ज केला व सदर सर्व कागदपत्रांची पुर्तता करणेबाबत तसेच पाठपुरावा करणेबाबत मला लेखी आदेशीत केले.
त्याअनुषंगाने मी पाठपुरावा करण्याकरीता संबधीत तलाठी नेहरुनगर श्री चव्हाण व मंडळ अधिकारी सोरेगांव श्री लटके यांना भेटलो असता त्यांनी आमचा वर नमुद बंद असलेला 7/12 उतारा पुन्हा चालु करण्याच्या अनुषंगाने महसुल अधिनियम कलम 155 अंतर्गत तहसिल कार्यालय उ. सोलापूर येथे प्रस्ताव सादर करण्याकरीता माझ्याकडे 6,00,000/- रु. लाचेची मागणी करीत असुन मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांच्यावर योग्य ती कारवाई करावी ही विनंती अशी तक्रार सांगीतली. व तशी सविस्तर हस्तलिखित तक्रार नोंदविली.
त्यानंतर पोनि महाडिक यांनी मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांचेवर मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे निवासस्थानाच्या शेजारी असलेल्या तलाठी नेहरूनगर यांचे कार्यालय येथे पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने मला तसेच पंच 01 यांना योग्य त्या सुचना देवुन, त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील मोटार सायकलवरुन मा.जिल्हाधिकारी, सोलापूर यांचे निवासस्थानाच्या शेजारी असलेल्या तलाठी नेहरूनगर यांचे कार्यालय येथे जाणेकरीता रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच 01 असे सदर ठिकाणी गेलो असता, तेथे तलाठी चव्हाण हे त्यांच्या खोलीत उपस्थित होते. तेथे मी तलाठी चव्हाण यांचेशी आमचे प्रलंबित कामाबाबत चर्चा केली असता तलाठी चव्हाण यांनी त्यांचे मोबाईल क्रंमाकवरुन मंडळ अधिकारी लटके यांना फोन करुन मी आलो असल्याबाबत सांगुन मला लटके यांचे सांगणेप्रमाणे रंगभवन येथील मंडळ अधिकारी कार्यालय येथे घेवुन गेले.
सदर ठिकाणी मी पंच 01 यांचे सह मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांची भेट घेतली असता मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण हे वारंवार माझ्याशी लाच रक्कमेच्या अनुषंगाने संभाषण करीत होते. तसेच मंडळ

अधिकारी लटके यांनी त्यांचे (हाताची सहा बोटे दाखवुन) आपलं त्या दिवशी बोलण झालंय, म्हणलं ठिक हाय आम्ही दोघ असं.. असं.. तर तुम्ही म्हणले नाही, असे इशा-यामध्ये सहा लाख रुपयांची मागणी केली परंतु सदर ठिकाणी मी घाबरलो असल्याने सदर लाच रक्कम स्पष्ट होईल या करीता तोंडाने उच्चार केला नाही तसेच तलाठी चव्हाण हे वारंवार पंच 01 यांचेकडे संशयाने बघुन त्यांचेबाबत विचारणा करु लागल्याने मी फोन करुन बोलतो असे म्हणुन घाबरुन तेथुन निघुन आलो.

सदर प्रकरणातील झाले पडताळणी कारवाईमध्ये मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांनी माझ्या प्रलंबित कामाच्या अनुषंगाने किती लाच रक्कमेची मागणी केली हे स्पष्ट न झाल्याने मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांचेवर पुन्हा पडताळणी कारवाई करण्याचे ठरविण्यात आले.

त्यानंतर मी बाथरुम करीता बाहेर गेल्यानंतर मला तलाठी चव्हाण यांचा मो.क्रं. 9371233712 वरुन माझा मो. क्रं. 9834351659 वर फोन आला. परंतु तो माझ्याकडुन रिसिव्ह न झाल्याने मी पुन्हा तलाठी चव्हाण यांना फोन केला असता चव्हाण यांनी मला कोठे आहे असे विचारुन त्यांचे कार्यालयाकडे येण्यास सांगीतले. त्यावर मी त्यांना होकार दिला त्यानंतर काहीवेळातच मला पुन्हा तलाठी चव्हाण यांचा फोन आला व त्यांनी मला रंगभवन चौक येथील मंडळ अधिकारी कार्यालय येथे येण्यास सांगीतले. त्यामुळे मी लागलीच अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात जावुन पोनि महाडिक व दोन्ही पंचाना हकीकत सांगीतली.

तलाठी चव्हाण यांनी मला भेटण्याकरीता रंगभवन चौक येथील मंडळ अधिकारी कार्यालय येथे येण्यास सांगीतले असल्याने मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांचेवर पुन्हा रंगभवन चौक येथील मंडळ अधिकारी कार्यालय येथे पडताळणी कारवाई करण्याचे अनुषंगाने पोनि महाडिक यांनी मला तसेच पंच 01 यांना योग्य त्या सुचना देवुन, त्यांच्याकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील मोटार सायकलवरुन रंगभवन चौक येथील मंडळ अधिकारी कार्यालय येथे जाणेकरीता रवाना केले. त्याप्रमाणे मी व पंच 01 असे सदर ठिकाणी गेलो असता, कार्यालयात लटके व चव्हाण हे उपस्थित नव्हते. त्यामुळे मी तलाठी चव्हाण यांना फोन केला असता तलाठी चव्हाण यांनी मला कार्यालयाच्या आवारात उभी असलेल्या लटके यांच्या चारचाकी गाडीमध्ये येण्यास सांगीतले. तेथे तलाठी चव्हाण व मंडळ अधिकारी लटके हे लटके यांच्या चारचाकी गाडीत बसलेले होते. सदर ठिकाणी मी व पंच असे जावुन मी लटके यांच्या वाहनात पाठीमागील सिटवर बसलो. माझ्यासोबत पंच देखील गाडीत बसत असताना लटके यांनी पंच यांना हात दाखवुन बाहेरच थांबणेबाबत इशारा केला त्याप्रमाणे पंच 01 हे गाडीच्या बाहेर थांबले.

त्यानंतर सदर ठिकाणी तलाठी चव्हाण यांनी (हाताने पैश्याचा इशारा करीत) काय झाल फायनल... असे विचारले. त्यावर मी त्यांचेशी आमचे प्रलंबित काम कसे पुर्ण होणार याबाबत विचारणा केली त्यावर लटके व चव्हाण यांनी कामाची प्रोसीजर सांगीतली. त्यानंतर लटके व चव्हाण यांनी यापुर्वी माझेकडे दोघांचे 03 – 03 लाख रुपये प्रमाणे 06 लाख रुपये लाचेची मागणी केली असल्याने त्यामध्ये तडजोड करीत दोघांचे 02 – 02 लाख रुपये देतो असे सांगुन त्यापैकी आज 02 लाख रुपये देतो असे मी सांगीतले. त्यावर लटके यांनी (त्यांच्या उजव्या हाताची पाच बोटे दाखवत) राऊंड फिगर केल असत तर असे म्हणुन 5 लाख रुपये लाच रक्कमेची मागणी केली. त्यावर मी त्यांना अडचण असल्याबाबत सांगीतले असता दोघांनी होकार दिला व तलाठी चव्हाण यांनी ते फोन केल्यानंतर लाच रक्कम घेवुन येण्यास सांगीतले. त्यावर मी होकार देवुन पंच 01 यांच्यासह पुन्हा अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डीग ऐकुण खात्री केली.

मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांनी ठरलेल्या 04 लाख रुपये लाच रक्कमेपैकी पहीला हप्ता 02 लाख रुपये हे त्यांनी फोन केल्यानंतर देण्याकरीता येण्यास सांगीतले असल्याने मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांच्यावर सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने सर्व सापळापुर्व कार्यवाही करण्यात आली व मी हजर केलेली लाच रक्कम 2,00,000/- रुपयांच्या नोटांना अँथ्रासिन पावडर लावुन सदरच्या नोटा कापडी पिशवीमध्ये ठेवुन सदरची लाच रक्कम असलेली कापडी पिशवी हे माझ्याकडे देण्यात आली. त्यानंतर आम्ही तलाठी चव्हाण यांच्या फोनची वाट बघत अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय येथेच थांबलो. त्यानंतर बराच वेळ होवुन देखील चव्हाण यांचा फोन न आल्याने पोनि महाडिक यांचे सुचनेवरुन मी तलाठी चव्हाण यांना फोन केला असता त्यांनी फोन रिसिव्ह केला नाही. त्यानंतर काहीवेळाने मला तलाठी चव्हाण यांचा फोन आला व त्यांनी मला रंगभवन चौक येथे येण्यास सांगीतले. त्याअनषंगाने त्यांच्यावर रंगभवन चौक येथे सापळा कारवाई करण्याच्या अनुषंगाने मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना त्यांच्या-त्यांच्या कामाच्या अनुषंगाने पोनि महाडिक यांनी योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांच्यावर सापळा कारवाई करण्याकरीता व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन ते माझ्या गळयात अडकवून मला व पंच क्र. 1 यांना माझ्याकडील दुचाकी वाहनावरुन रंगभवन चौक येथे

जाणेकरीता रवाना केले. तसेच आमचे पाठोपाठ पोनि महाडिक, पंच 02 व सापळा पथक असे शासकीय वाहनातुन निघाले. व पंच 01 असे सापळा कारवाईच्या अनुषंगाने मोटार सायकलवरुन अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालयातुन निघुन काही अंतरावर गेले असता तेथे जवळच असलेल्या महादेव मंदीरासमोर काही इसम उभे होते. त्यांच्यामध्ये तलाठी चव्हाण यांचेप्रमाणे दिसणारा एक इसम उभा असल्याचे मला दिसुन आले. त्यानंतर मी चव्हाण यांचे सांगणेप्रमाणे रंगभवन चौक येथे जावुन तेथील मंडळ अधिकारी कार्यालय येथे गेलो असता तेथे लटके व चव्हाण हे दिसुन आले नाहीत त्यामुळे मी चव्हाण यांना फोन केला असता तो त्यांनी रिसिव्ह केला नाही. त्यानंतर त्यांनी त्यांचा मोबाईल स्विच ऑफ केला केला म्हणुन माझी मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांचेशी भेट होवु शकली नाही. त्यामुळे मी पंच 01 यांच्यासह पुन्हा अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालय येथे परत आलो. तेथे पोनि महाडिक यांनी मला व पंच 01 यांना हकीकत विचारुन तसेच व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण खात्री केली. व तलाठी चव्हाण यांचा मला फोन आल्यास त्यांच्यावर सापळा कारवाई करण्याचे नियोजीत करण्यात आले. तसेच सदर दिवशीची सापळा कारवाई स्थगीत करुन पुढील कार्यवाही ही अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालयात करण्यात आली.त्यानंतर मी झाले प्रकाराबाबत खात्री केली असता 15/07/2024 रोजीच्या सापळा कारवाईवेळी अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालयाच्या जवळ असलेल्या महादेव मंदीरासमोर उपस्थित असलेल्या इसमांमध्ये तलाठी चव्हाण यांचेप्रमाणे दिसणारा इसम हा दुसरा कोणी नसुन तलाठी चव्हाण हेच होते व त्यांनी माझ्यावर पाळत ठेवुन मला अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयातुन बाहेर पडताना पाहीले असल्याने त्यांनी माझी भेट न घेता मोबाईल स्विच ऑफ करुन निघुन गेले. त्यामुळे मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांनी त्यानंतर माझ्याशी कोणताही संपर्क साधला नसुन यापुढे मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण हे माझ्याकडुन कोणतीही लाच रक्कम स्विकारतील असे वाटत नसुन त्यांचेवर दि. 15/07/2024 रोजीच्या झालेल्या पडताळणी कारवाईवरुन पुढील योग्य ती कारवाई करणेस विनंती आहे. असा जबाब नोंद केला. सदर कालावधीमध्ये मी, माझ्याकडे पैशाची मागणी करत असलेले मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांचेबाबत माहीती काढली असता लटके यांचे संपुर्ण नाव श्री संदिप भिमराव लटके, वय - 44 वर्षे, पद - मंडळ अधिकारी, नेम - सोरेगांव मंडळ, तहसिल उ. सोलापूर रा. फ्लॅट क्रं. 302, पारस अपार्टमेंट, चंदन नगर, जुळे सोलापूर व चव्हाण यांचे संपुर्ण नाव श्री पवनकुमार मोहनराव चव्हाण, वय - 38 वर्षे, पद – तलाठी, नेम - सज्जा नेहरुनगर, तहसिल उ. सोलापूर रा. श्री अजय जवळकर यांचे 111 शिवरत्न नगर, पतंजली स्टोअरच्या मागे, जुळे सोलापूर येथे भाडेतत्वावर असे अल्याबाबत माहीती मिळाली असुन त्याबाबत मी खात्री केली आहे. तरी दि. 15/07/2024 रोजी 12.42 वा ते 14.29 वा.चे दरम्यान मंडळ अधिकारी लटके व तलाठी चव्हाण यांनी मिळुन रंगभवन चौक येथील मंडळ अधिकारी कार्यालय येथे व कार्यालयाच्या आवारात उभी असलेल्या लटके यांच्या चारचाकी गाडीमध्ये आमच्या नालंदा ईस्टेट डेव्हलपर्सच्या मालकीची नेहरु नगर येथील गट 28/1/2/2/ मधील एकुण 86 आर खुल्या जागेचा बंद असलेला 7/12 उतारा पुन्हा चालु करण्याच्या अनुषंगाने महसुल अधिनियम कलम 155 अंतर्गत तहसिल कार्यालय उ. सोलापूर येथे प्रस्ताव सादर करण्याकरीता दोघांचे 03 – 03 लाख रुपये प्रमाणे 06 लाख रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती दोघांचे 02 – 02 लाख रुपये प्रमाणे 04 लाख रुपयांना संमती देवुन त्यापैकी पहिला हप्ता 02 लाख रुपये स्विकारण्याचे मान्य करुन स्वत:चा वैयक्तिक आर्थिक फायदा मिळविण्याचा प्रयत्न केला असल्याने माझी मंडळ अधिकारी श्री संदिप भिमराव लटके व तलाठी श्री पवनकुमार मोहनराव चव्हाण यांच्याविरुध्द कायदेशीर फिर्याद आहे.

माझा वरील फिर्यादी जबाब हा अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर कार्यालयातील संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिंरट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा फिर्यादी जबाब दिला स.ता.म.

(उमाकांत महाडिक)
पोलीस निरीक्षक
अँन्टी करप्शन ब्युरो सोलापूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): **or** (किंवा)

Arvind Khanderao Mane(I (Inspector)) / PI

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Qureshi

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
जेलरोड पो.स्टे. सोलापूर शहर

**Signature of Officer in charge Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): Arvind Khanderao M
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI